महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

**GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV**

कोविड-19 इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) 413 501

**e-mail:** deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमधा/भांडार/HMIS/साहित्य/दरपत्रके/ 2154 /२०२६, दिनांक: 09 /०७/२०२६

<u>दरपत्रके</u>

प्रति,

-------------------------

---------------------------

------------------------------.

विषय :- **HMIS नोंदणी काऊंटरसाठी किरकोळ साहित्य खरेदी करणेकरिता दरपत्रके प्रसिध्द करणेबाबत...**

संदर्भ :- १) प्रभारी, Nextgen eHospital यांचे मागणीपत्र आ.क्र.४४४७ दिनांक ०६/०७/२०२६

२) दिनांक ०९ /०७/२०२६ रोजीची कार्यालयीन मंजुर टिप्पणी.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की नवनिर्मीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव अधिनस्त महाविद्यालय अधिनस्त जिल्हा रुग्णालय व स्त्री-रुग्णालय येथील **Nextgen eHospital प्रणाली** विभागांतर्गत रुग्णनोंदणी काऊंटरवरील दैनंदीन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक किरकोळ साहित्य खरेदी करण्याची संस्थेस आवश्यकता आहे.

तरी सोबत जोडलेल्या दरपत्रकात नमुद स्टेशनरी साहित्य खरेदी करणेकामी पात्र निविदा धारकांकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. यास्तव दि.०९/०७/२०२६ ते दि.१५/०७/२०२६ पर्यंत इच्छुक निविदाधारकांनी दरपत्रकातील विहित अटी व शर्तींना अनुसरुन अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये खालील नमुद पत्त्यावर आपले दरपत्रक सादर करण्यात यावे. सिलबंद पाकीटावर मध्यभागी **"Nextgen eHospital प्रणाली विभागास किरकोळ साहित्य पुरवठा करणेबाबत दरपत्रके"** असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

**सोबत:** दरपत्रक नोटीस जोडली आहे.

(डॉ. शैलेंद्र चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

प्रत:- १) सुचना फलक जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.

२) संकेतस्थळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव.

२) प्रभारी, Nextgen eHospital विभाग, शा.वै.म., धाराशिव.

**कार्यालयाचा पत्ता**

**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,**
**जिल्हा सामान्य रुग्णालय आवार,**
**धाराशिव-४१३५०१**

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

### दरपत्रक नोटिस

शासकीय वैद्यकीय महावि महाविद्यालय अधिनस्त जिल्हा रुग्णालय व स्त्री-रुग्णालय येथील Nextgen eHospital प्रणाली विभागांतर्गत रुग्णनोंदणी काऊंटरवरील दैनंदीन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक करिकोळ साहित्य खरेदी करणे कामी निविदा धारकाकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक निविदाधारकांनी दि.०९/०७/२०२६ ते दि.१५/०७/२०२६ पर्यंत अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफा मध्ये आपले दरपत्रक करार सादर करावेत.

**दरपत्रके सादर करतेवेळी अधिकृत लेटरहेड वर खालील प्रमाणे विहित नमुन्यात तसेच अटी व शर्तींना अनुसरुनच माहिती सादर करावी अन्यथा निविदा प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

| अ. क्र. | साधनसामुग्रीचे नाव | आवश्यक नगसंख्या | जीएसटी (%) | जीएसटी रक्कम | प्रति नग किंमत (Taxable) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Paper Rim (A4 Size 80 GMS White Paper) | 1000 | | | |
| 02 | Ink Bottle (For Outdoor inkjet printer 150 ml, black color) | 200 | | | |

**अटी व शर्ती:**

०१) दरपत्रक मोहरबंद लिफाफा दिनांक १५/०७/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावेत. जाहिर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत/ ग्राह्य धरले जाणार नाहीत.

०२) सुचना फलक/ संकेतस्थळावरील जाहिर नोटीस प्रमाणे इच्छुक कंपनीस दरपत्रक मोहरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे. दरपत्रक मोहरबंद **लिफाफा "अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव" यांचे नावे** विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा.

०३) दरपत्रक मोहरबंद लिफाफ्यावर **"Nextgen eHospital प्रणाली विभागास किरकोळ साहित्य पुरवठा करणेबाबत दरपत्रके"** तसेच मोहरबंद लिफाफा जमा करण्याचा **अंतिम दिनांक** दरपत्रधारकाच्या नावाचा **शिक्का** इत्यादी नमुद असणे आवश्यक आहे.

०४) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्त्ऐवज:

- एसटी (GST) क्रमांक असलेल्या अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक
- जीएसटी प्राधिकृत प्रत
- पॅन कार्ड
- शॉप ॲक्ट
- शासकीय कार्यालयामध्ये काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र (Valid PO)
- एकल दरपत्रक धारक असल्याबाबतचे हमीपत्र **"ANNEXURE-A"** (सोबत नमुना जोडला आहे).

वरील सर्व दस्तऐवज जोडणे बंधनकारक आहे **(दिलेल्या क्रमाने जोडण्यात यावेत)**.

०५) पुरवठा करण्यात येणारी सामग्री उच्च दर्जाची असावी अन्यथा नाकारण्यात येऊन पुरवठा आदेश रद्द करण्यात येतील.

०६) सर्वात कमी दर सादर करणाऱ्या पात्र निविदाधारकाचे दर हे पूढिल ०६ महिन्यांकरिता गोठविण्यांत येतील. कार्यालयाच्या आवश्यकतेनूसार वेळोवेळी त्याच दराने सामुग्री विहित वेळेत (०७ दिवसात) पूरवठा करणे बंधनकारक राहिल.

०७) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटी अथवा शर्तींमध्ये आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण/पुर्वसुचना न देता नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर निविदा प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता) यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**नोंद:-** **सदर दर पत्रके मा. अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्याची वेळ दिनांक. १६/०७/२०२६ रोजी ११.३० वाजता राहिल. सदर नियोजित वेळेत कोणताही बदल झाल्यास निविदाधारकांना तशी पुर्वसुचना देण्यात येईल.**

(डॉ. शैलेंद्र चौहान)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव

**ANNEXURE-B**

एकल दरपत्रक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेडवर

Letter No. Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
धाराशिव.

विषय :- एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. ______________________
दिनांक ______________

महोदय

संदर्भांकित दरपत्रक मागणी पत्रानुसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## हमीपत्र (Undertaking)

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अश्याप्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेमध्ये सादर केलेला नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिकाऱ्यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य/खोटी आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्‌संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

अधिकृत वितरकाचे नाव व स्वाक्षरी,
शिक्का अणि मोहर
Authorized Person Name,
Signature
with Stamp and Seal